नि.फौ.ख.क्र. ७३/२०२५

सरकार –वि– अमोल गवई

नि.क्र. १३

## सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – विठ्ठल महादेव ताठे,

वय. ४५ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार – पहुरपुर्णा, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

## सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपीला मी ओळखतो कारण की तो माझ्याच गावचा आहे. दि.०९.०३.२०२५ रोजी आमच्या गावात तुकाराम महाराजांच्या उत्सवाचा कार्यक्रम हनुमान मंदिरात रात्री ०८.०० ते १०.०० च्या दरम्यान होता. त्या कार्यक्रमामध्ये गावचे संपूर्ण लोक हजर होते. दि. १२.०३.२०२५ रोजी कार्यक्रम सुरु असतांना आरोपी रात्री ०९.३० वाजता तेथे येवून आवाज कमी करा आवाज कमी करा असे म्हणु लागला होता. त्यावेळेस आवाज कमीच असल्याचे मी त्याला म्हटले होते. त्यानंतर आरोपीने मला शिवीगाळ केली व माझ्या उजव्या हाताच्या दंडाला आरोपीने चावा घेतला. त्यामुळे माझ्या हाताच्या दंडातून रक्त निघाले व मला चक्कर आली. शुभम उमाळे व रामेश्वर बाराहाते यांनी मला आरोपीच्या तावडीतून सोडविले. त्याठिकाणी गुणवंत बाराहाते, बळीराम भारसाकळे व एकनाथ दळवी हजर होते. त्यानंतर मी शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तक्रार द्यायला गेलो. आता मला तक्रार व छापील एफ.आय.आर. दाखविला. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.१४ व १५** देण्यात येते. पोलीसांनी मला शेगाव येथील सईबाई मोटे रुग्णालयात उपचारासाठी नेले होते. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

## उलटतपास आरोपीतर्फे श्री. पी. बी. वानखडे, वकील यांचे मार्फत.

२. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेची तारीख माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये सरकारी वकीलांनी मला घटनेची तारीख सांगितल्यामुळे मला घटनेची तारीख माहिती झाली होती. मी रात्री १०.०० वाजता पोलीस स्टेशनला गेलो होतो. मी पोलीस स्टेशनला १० ते १५ मिनिटे थांबलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यानंतर माझ्या घरी निघून गेलो होतो. मी सरकारी रुग्णालयात दोन तास थांबलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सरकारी रुग्णालयात माझा उपचार झाल्यानंतर मी घरी निघून गेलो होतो.

३. माझ्याजवळ स्वतःची मोटारसायकल नाही. शेगाववरुन पहुरपुर्णा गाव १०–१२ किलोमीटर अंतरावर आहे की काय हे मला माहिती नाही. पहुरपुर्णा गावावरुन शेगावला

मोटारसायकलने यायला २० मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, रामेश्वर बारहाते व शुभम उमाळे माझ्या गावचेच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शुभम उमाळे व रामेश्वर बारहाते हे गावचे असल्यामुळे त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ दळवी, गुणवंत बारहाते, बळीराम भारसाकळे हे माझ्या गावचे असल्यामुळे माझे त्यांच्याशी चांगले संबंध आहेत. या प्रकरणातील घटनेमुळे आरोपीसोबत माझे पटत नसून त्याच्याशी माझे वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हनुमान मंदिराच्या समोर बौध्द वस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे घर बौध्द वस्तीत आहे. आरोपीचे घर हनुमान मंदिरापासून बरेच लांब आहे की काय याबाबत मला माहिती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरात होत असलेल्या सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी भिंतीपत्रक छापल्या जाते. कार्यक्रमाचे भिंतीपत्रक तपासादरम्यान मी पोलीसांना दिले होते की नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरात होत सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी लाऊडस्पीकर लावतात. लाऊडस्पीकर लावण्यासाठी परवानगी घ्यावी लागते की काय याबाबत मला माहिती नाही. मी साधारणपणे फुल हाताचा शर्ट घालतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, घटनेच्या दिवशी मी टि शर्ट घातला होता. आरोपीने माझ्या उजव्या हाताच्या दंडाला चावाल्यामुळे मी घातलेले टि शर्ट रक्ताने माखले होते. रक्ताने माखलेल टि शर्ट मी पोलीसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट दिल्यानंतर माझा पोलीसांशी संपर्क आला नाही. रिपोर्ट देतांना मला चक्कर आल्याची बाब मी पोलीसांना सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडीवरुन पडल्यामुळे मला जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास संपला.**</u>

<u>**फेरतपास काही नाही.**</u>

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०१.२०२६ | दि.२३.०१.२०२६ |